**ठळक बातम्या**

- १५ हजार ४०० टन एलपीजी घेऊन भारताचं ग्रीन आशा जहाज मुंबईजवळच्या जेएनपीए बंदरात दाखल
- विधानसभा निवडणुकीसाठी ११ वाजेपर्यंत पुदुचेरीत ३७ टक्के, आसाममधे ३९ टक्के तर केरळात ३३ टक्के मतदानाची नोंद
- महाराष्ट्रात बारामती विधानसभा पोटनिवडणुकीतून काँग्रेसची माघार

**आणि**

- आयपीएल क्रिकेटमध्ये आज कोलकाता नाईट रायडर्स विरुद्ध लखनौ सुपर जायंट्स हा सामना ईडन गार्डन्सवर रंगणार

**<><><><><>**

भारताचा ध्वज लावलेलं ‘ग्रीन आशा’ नावाचं एलपीजी वाहून आणणारं जहाज होर्मूझची सामुद्रधुनी यशस्वीरीत्या पार करून आज मुंबईजवळच्या जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण म्हणजे जे एन पी ए च्या बंदरात दाखल झालं आहे. त्यात १५ हजार ४०० टन एलपीजी साठा आहे. इराण, अमेरिका आणि इस्राएल मध्ये युद्ध सुरु झाल्यापासून जे एन पी ए बंदरात येणारं हे पहिलंच एलपीजीवाहु जहाज आहे. जहाज आणि त्यावरचे सर्व कर्मचारी सुरक्षित आहेत. अस्थिर युद्धपरिस्थितीत देशाच्या एलपीजी पुरवठ्याचं सातत्य राखण्यात भारताच्या सागरी वाहतुकीची कार्यक्षमता यातून दिसून येते.

**<><><><><>**

भारतातल्या लोकशाहीचं चैतन्य आणि समावेशकता वाढीच्या दृष्टीने संसदेत स्त्रियांसाठी आरक्षण आवश्यक आहे असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. कायदेमंडळातलं महिला आरक्षण हे विधेयक मंजूर करण्याच्या दृष्टीने संसदेत या

महिन्याच्या १६ तारखेला  चर्चा होणार आहे. या पार्श्वभूमीवर मोदी यांनी एका लेखातून आपले विचार सामायिक केले आहेत. महिला आरक्षणासाठी समित्या नेमल्या गेल्या, विधेयकाचा मसूदा तयार झाला परंतू  ते विधेयक अजून संसदेत मंजूर झालेलं नाही असं त्यांनी म्हटलं आहे. सप्टेंबर २०२३मध्ये संसदेने नारीशक्ती वंदन अधिनियम मंजूर केल्याची आठवण त्यांनी या लेखात करुन दिली आहे.

भारताच्या लोकसंख्येपैकी निम्मी संख्या महिलांची आहे आणि देशासाठीचं त्यांचं योगदान अमूल्य आहे.  स्त्रीच्या प्रगतीत देशाची प्रगती सामावलेली आहे या तत्वानुसार कायदेमंडळात स्त्रियांना प्रतिनिधीत्व हे देशभरातल्या कोट्यवधी महिलांच्या आकांक्षांचं प्रतिबिंब आहे असं मोदी यांनी लेखात मांडलं आहे. स्त्रिया जेव्हा  प्रशासन आणि निर्णय घेण्याच्या प्रक्रियांमध्ये भाग घेतील तेव्हा त्यांचा अनुभव आणि दृष्टीकोन यामुळे सार्वजनिक व्यवहाराचं क्षेत्र समृद्ध होईल आणि प्रशासकीय व्यवहाराचा दर्जा वाढेल असं मोदी यांनी या लेखात म्हटलं आहे.

**<><><><><>**

जागतिक बँकेनं भारताच्या आर्थिक वाढीच्या दराचा अंदाज बदलून वाढवला आहे. या आधी २०२६ - २७ या वर्षात भारताची जीडीपी वाढ ६ पूर्णांक ३ दशांश टक्के दरानं होईल असा अंदाज होता. तो आता ६ पूर्णांक ६ दशांश टक्के असेल असं जागतिक बँकेच्या ताज्या अहवालात म्हटलं आहे.

या वर्षात भारत दक्षिण आशियातल्या आर्थिक प्रगतीचं इंजिन असेल असं अहवालात म्हटलं आहे.

**<><><><><>**

लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी आज गोव्यात राष्ट्रकुल संसदीय संघटना – भारत विभाग - ७ च्या  संमेलनाचं उद्घाटन केलं.  आंतर संसदीय सहकार्य वृद्धिंगत करणं तसंच विकासाच्या प्रमुख मुद्दयांवर चर्चा करण्यासाठी या २ दिवसीय

संमेलनाचं आयोजन करण्यात आलं आहे. संमेलनाच्या पहिल्या दिवशी आज, २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्याचं ध्येय साध्य करण्यात युवा संसद सदस्यांचं योगदान या विषयवार चर्चासत्र होणार आहे.  तर उद्या  व्यापार, पर्यटन, शहरीकरण, पर्यावरण यासारख्या प्रादेशिक महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा होणार आहे.

<><><><><>

पुदुचेरी, आसाम आणि केरळ विधानसभा निवडणुकांसाठी आज मतदान होत आहे. तिन्ही ठिकाणी मतदारांचा उत्साह दिसत आहे. केरळात सर्व १४० मतदारसंघात उत्साहाने मतदान होत असून ११ वाजेपर्यंत ३३ टक्के मतदान झालं. आसाममधे १२६ जागांवर  ३९ टक्के तर पुदुचेरीतल्या ३० जागांवर ३७ टक्के मतदारांनी मतदान केलं.

केरळमधे मुख्यमंत्री पिनराई विजयन, काँग्रेस खासदार शशी थरूर, अभिनेता मोहनलाल या मान्यवरांनी मतदानाचा हक्क बजावला. आसाममधे मुख्यमंत्री हिमंता बिस्व सरमा, काँग्रेस खासदार गौरव गोगोई यांच्या सह अनेक मान्यवरांनी मतदान केलं. राज्यात अनेक ठिकाणी भर पावसातही मतदारांनी मतदान केंद्रांवर गर्दी केली आहे.

<><><><><>

कर्नाटकातल्या बागलकोट आणि दावणगिरी विधानसभा मतदारसंघातल्या पोटनिवडणुकीसाठी देखील आज मतदान होत आहे. सकाळी ११ वाजेपर्यंत बागलकोटमधे २७ पूर्णांक ८३ शतांश तर दावणगिरीत २२ पूर्णांक ०१ शतांश टक्के मतदान झालं.

नागालँडमधे २८ कोरिडांग मतदारसंघात तसंच त्रिपुरातल्या धर्मनगर मतदारसंघात विधानसभा  पोटनिवडणुकीसाठी मतदान होत आहे.

गोव्यातल्या पोंडा विधानसभा मतदारसंघातली पोटनिवडणुकीची अधिसूचना मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा पीठानं काल रद्दबातल ठरवली . त्यामुळे तिथ आज मतदान होणार नाही.

<><><><><>

बारामती विधानसभा पोटनिवडणुकीतून काँग्रेसने आपला उमेदवार मागे घेतला आहे, त्यासाठीचे निर्देश काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्निथला यांनी दिले आहेत. काँग्रेसने आपला उमेदवार मागे घ्यावा असं आवाहन आज राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे नेते शरद पवार, सुप्रिया सुळे आणि रोहित पवार यांनी केलं होत. या पोटनिवडणुकीसाठी ५५ अर्ज आले आहेत. अर्ज मागे घेण्यासाठी आजचा शेवटचा दिवस आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूमुळे ही जागा रिकामी झाली होती, तिथून राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या सुनेत्रा पवार निवडणूक लढवत आहेत. दिवंगत अजित पवार यांनी एकेकाळी काँग्रेसबरोबर काम केलं होतं आणि त्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने या स्पर्धेतून बाहेर पडावं हीच अजित पवार यांना खरी श्रद्धांजली ठरेल, असा सल्ला शरद पवार यांनी दिला होता.

<><><><><>

राज्यसभेचे नवनिर्वाचित सदस्य राष्ट्रवादी काँग्रेसचे पार्थ अजित पवार यांना आज उपराष्ट्रपती तसंच राज्यसभेचे अध्यक्ष सी पी राधाकृष्णन यांनी पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. महाराष्ट्रातून राज्यसभेसाठी निवडून आलेल्या पार्थ पवार यांचा शपथविधी संसद भवनातल्या अध्यक्षांच्या परिषद कक्षात झाला.

<><><><><>

परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर आजपासून मॉरिशस आणि संयुक्त अरब अमिराती या देशांच्या दौऱ्यावर रवाना होत आहेत. पहिल्या टप्प्यात मॉरिशसमध्ये

9व्या हिंद महासागर परिषदेत ते सहभागी होणार असून तिथ बीजभाषण करणार आहेत. तसच ते मॉरिशसच्या नेत्यांशी संवाद साधून द्विपक्षीय संबंधांचा आढावा घेतील. दुसऱ्या टप्प्यात एस जयशंकर संयुक्त अरब अमिरातीच्या भेटीवर जाणार असून तिथ ते व्यापक द्विपक्षीय धोरणात्मक भागीदारी वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने चर्चा करतील.

**<><><><><>**

भारतानं संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आर्थिक आणि सामाजिक परिषदेच्या अखत्यारीतल्या, ४ संस्थांच्या निवडणुकीत, बिनविरोध विजय मिळवत महत्त्वपूर्ण राजनैतिक यश मिळवलं आहे. संयुक्त राष्ट्राच्या मुख्यालयात काल झालेल्या निवडणुकांमध्ये सदस्य राष्ट्रांनी एकमतानं भारताला निवडून दिलं. माजी वरिष्ठ राजनैतिक अधिकारी प्रीती सरन यांची आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्क समितीवर पुन्हा एकदा निवड झाली.

**<><><><><>**

परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी आज अमेरिकेचे संरक्षण धोरण विभागाचे उच्चपदस्थ अधिकारी  एल्ब्रिज कोल्बि यांची भेट घेतली. विक्रम मिस्त्री तीन दिवसांच्या अमेरिका दौऱ्यावर आहेत. हिंद प्रशांत महासागर क्षेत्र आणि पश्चिम आशियातल्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर या दोघामध्ये चर्चा झाली.

**<><><><><>**

बँकिंग तसंच आर्थिक व्यवहार सेवा आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रांच्या समभागांमध्ये झालेल्या घसरणीमुळे आज भारतीय शेअरबाजाराच्या निर्देशांकांनं सकाळच्या सत्रात अर्ध्या टक्क्याहून अधिक घसरण नोंदवली. सकाळी सेन्सेक्स ६३७ अंकांनी घसरुन ७६ हजार ९२५ वर आला तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी १४९ अंकांनी घसरुन २३ हजार ८४९ वर आला.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेटमध्ये आज कोलकाता नाईट रायडर्स आणि लखनौ सुपर जायंट्समध्ये सामना रंगेल. कोलकाता इथे इडन गार्डन मैदानावर संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना सुरु होईल.

दिल्लीच्या अरुण जेटली मैदानावर काल दिल्ली कॅपिटल्स आणि गुजरात टायटन्स यांच्यात रंगलेल्या चुरशीच्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सचा निसटता पराभव झाला. गुजराथ टायटन्सने उभारलेल्या २१० धावांच्या आव्हानांला उत्तर देताना दिल्ली कॅपिटल्सने २०९ धावसंख्या उभारली.

//<><><><><>//